# शिवसेना
## उध्दव बाळासाहेब ठाकरे
(दिवा शहर)
**श्री. नागेश वसंत पवार** (विभाग प्रमुख) मो. ८३५५९००९६२

संपर्क: ४/१९, श्री साईदत्त चाळ, विकास म्हात्रे गेट, दिवा (पूर्व) ई - मेल nagesh0815@gmail.com


दिनांक १०/०३/२०२५


ठाणे महानगरपालिका मुख्य कार्यालय
10 MAR 2025
आवक क्र. 30669
आवक लिपिक


प्रति,
मा.आयुक्त साहेब ,
ठाणे महानगरपालिका,
म.न.पा भवन चंदनवाडी, पाचपाखाडी ठाणे - ४००६०२

विषय : दातिवली तलावात सुरू असलेले काम बंद करून मे. यु. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि व संबंधित जबाबदार अधिकारी यांचेवर कारवाई करणे बाबत ...

महोदय ,

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत ठाणे महापालिका क्षेत्रातील सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत दातीवली तलावाचे संवर्धन व सुशोभीकरणाचे काम १८/०४/२०२३ रोजी १२ महिन्यांच्या मदतीसह मे. यु. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि यांना देण्यात आले, त्यांनी सदरचे काम विहित मुदतीत पूर्ण केले नाहीच परंतु मुदत संपल्यानंतर मुदत वाढ न घेता तसेच कंत्राटावरील कामगारांच्या विम्याचे नूतनीकरण न करता परस्पर माहे जानेवारी २०२५ ला काम चालू करून कंत्राटी कामगारांचे जीव धोक्यात टाकण्याचे काम कंत्राटदाराने केले असून महापालिकेच्या कार्यपद्धती व सूचनांना पायदळी तुडवण्याचे काम ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांनी केले आहे.

संबंधित ठेकेदार व बेजवाबदार अधिकाऱ्यांवर शासकीय नियमानुसार कारवाई करण्यात यावी तसेच कंत्राटी मजुरांच्या संरक्षण विम्याचे नूतनीकरण व संबंधित कामाला पालिकेची मुदतवाढ मिळे पर्यंत काम बंद करण्यात यावे अशी नम्र विनंती.

कळावे.

आपला नम्र
Nagesh

Scanned with OKEN Scanner